पुढारी




सातारा : प्रशिक्षण प्रमाणपत्रासह डॉ. बी. एस. सावंत, डॉ. आर. डी. कुंभार व सायबर वॉरियर्स.

# 'सायबर वॉरियर्स'ना सायबर सुरक्षेचे विशेष प्रशिक्षण

**सातारा : पुढारी वृत्तसेवा**

वर्ये, ता. सातारा येथील कर्मवीर भाऊराव पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अ‍ॅण्ड रिसर्च सेंटरमध्ये 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमांतर्गत महाविद्यालयातील सायबर वॉरियर्स स्वयंसेवकांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले. वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागृतीसाठी हे प्रशिक्षण होते.

यामध्ये सायबर गुन्ह्यांचे स्वरुप, फिशिंग हल्ले, सोशल मीडिया सुरक्षा, मजबूत संकेतशब्दांची निर्मिती, वैयक्तिक माहितीचे संरक्षण, डिजिटल फूटप्रिंट, एआयचा वापर तसेच ऑनलाईन फसवणूक टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. प्रात्यक्षिके, गटचर्चा व संवादात्मक उपक्रमांचा समावेश होता. या उपक्रमाचे आयोजन संगणकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. आर. डी. कुंभार यांनी संचालक डॉ. बी. एस. सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली केले.

My Satara Edition
Jul 20, 2026 Page No. 02
Powered by: erelego.com